# वृक्षारोपणाचे ठक्कर समूहाचे ग्रीन मिशन प्रशंसनीय : ना. महाजन

नाशिकः-संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात स्थावर मालमत्ता विकसन क्षेत्रात आघाडीचे नाव असलेल्या येथील ठक्कर्स उद्योग समूहाने सन २०१२ मध्ये ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने नाशिक शहर व परिसरात १ लाख झाडे लावण्याचा संकल्प केला असून, या महत्त्वाकांक्षी मिशनच्या अंतर्गत गेल्या ३ वर्षांत ३५ हजार झाडे लावण्यात आली असून, चालू लागवड हंगामात एकूण २० हजार झाडे लावण्यात येणार आहेत. या हंगामात आतापर्यंत १२ हजार झाडे लावण्यात आलेली आहेत.

ठक्कर्स समूहातर्फे या ग्रीन मिशनअंतर्गत नुकतेच महाराष्ट्राचे पाणीपुरवठा मंत्री व नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे भोसला मिलिटरी स्कूलच्या २५० विद्यार्थ्यांनी यात भाग घेऊन आडगाव येथील विस्तीर्ण भूखंडावर वृक्षारोपण केले.

याप्रसंगी बोलताना ना. महाजन यांनी ठक्कर्स समूहाचे हे मिशन प्रशंसनीय असल्याचे सांगितले. वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन आणि पर्यावरण संरक्षण यांचीही नितांत गरज असल्याचे प्रतिपादन करून याच आशयाची शपथही त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली.

याप्रसंगी आ. प्रा.सौ. देवयानी फरांदे, आ. सौ. सीमा हिरे, नाशिकचे जिल्हाधिकारी दीपेंद्रसिंग कुशावह, क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष जयेशभाई ठक्कर, सुनील भायभंग तसेच ठक्कर्स ग्रुपचे संचालक नरेंद्र ठक्कर, गौरव ठक्कर, अभिषेक ठक्कर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.




**ठक्कर्स समूहातर्फे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात उपस्थितांना वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाची शपथ देताना पालकमंत्री ना. गिरीश महाजन. समवेत आ.सौ. देवयानी फरांदे, जिल्हाधिकारी दीपेंद्रसिंग कुशावह, नरेंद्र ठक्कर, राजेंद्र ठक्कर.**